# FAQ वारंवार विचारले जाणारे संभाव्य प्रश्न व त्याची उत्तरे.

## गट – १ / Group I : अनुज्ञप्ती मिळण्याबाबत अर्ज व कागदपत्रे.

| | |
|---|---|
| **प्र. क्र. १** | विभागाचे संकेतस्थळाबाबत माहिती द्यावी. |
| **उत्तर** | https://stateexcise.maharashtra.gov.in हे विभागाचे अधिकृत संकेतस्थळ आहे. |
| **प्र. क्र. २** | जिल्हास्तरावर राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कार्यालय प्रमुख कोण असतात. |
| **उत्तर** | जिल्हास्तरावर राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कार्यालय प्रमूख अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क हे असतात. |
| **प्र. क्र.३** | पर्यटनासाठी गोवा राज्यात गेल्यानंतर परत येतांना किती मद्याच्या बाटल्या घेऊन येता येतात? |
| **उत्तर** | पर्यटनासाठी गोवा राज्यात गेल्यानंतर महाराष्ट्र राज्यात परत येतांना विदेशी मद्याच्या बाटल्या घेऊन येता येत नाहीत. गोवा राज्याचे मद्य महाराष्ट्र राज्यात बेकायदेशीररित्या घेवून आल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. |
| **प्र. क्र.४** | गायी/म्हैस यांना कडबा कुट्टी करुन खाद्य दिले जाते. त्यामध्ये मळीचे मिश्रण करावयाचे असल्यास त्याला कोणते लायसन्स/परवाने घ्यावे लागतील? |
| **उत्तर** | गायी/म्हैस यांना कडबा कुट्टी करुन खाद्य दिले जाते त्यामध्ये मळीचे मिश्रण करावयाचे असल्यास त्याला एम ३ A हा परवाना लागतो. परवान्या करिता आपले सरकार पोर्टल व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करता येईल. तसेच अर्ज करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे विभागाच्या नागरिकांची सनद मध्ये नमूद करण्यात आली आहे. |

*************************************************************************************

## गट – २ / Group II : मद्याचे प्रकार व तत्सम माहिती.

| | |
|---|---|
| **प्र. क्र. १** | निरा म्हणजे काय? |
| **उत्तर** | निरा याचा अर्थ नारळ, शिंदी,खजूर किंवा कोणत्याही प्रकारच्या ताडाच्या झाडापासून आंबू नये म्हणून विहीत केलेल्या रितीने क्रिया केलेल्या पात्रात काढलेला न आंबवलेला असा रस आहे. सुर्यप्रकाशाची किरणे निरेवरती पडल्यास किण्वन प्रक्रिया सुरु होते व त्यापासून ताडी बनते. |
| **प्र. क्र. २** | ताडी म्हणजे काय? |
| **उत्तर** | ताडी याचा अर्थ नारळ, शिदी,खजूर किंवा कोणत्याही प्रकारच्या ताडाच्या झाडापासून काढलेला आंबवलेला किंवा न आंबवलेला रस असा आहे. |
| **प्र. क्र. ३** | तीव्र बिअर मध्ये अल्कोहोलचे प्रमाण किती असते? |
| **उत्तर** | तीव्र बिअर मध्ये अल्कोहोलचे प्रमाण ५% ते ८% v/v इतके असते. |
| **प्र. क्र.४** | सौम्य बिअर Mild Beer मध्ये अल्कोहोलचे प्रमाण किती असते? |
| **उत्तर** | सौम्य बिअर Mild Beer मध्ये अल्कोहोलचे प्रमाण ५% v/v पर्यंत असते. |
| **प्र. क्र. ५** | ड्रॉफ्ट बिअर (Draught Beer)म्हणजे काय? |
| **उत्तर** | सर्वसाधारणपणे ड्रॉफ्ट बिअर (Draught Beer) याचा अर्थ पाश्चरायझेशन न केलेली पिंपामध्ये साठवलेली बीयर असा आहे. |
| **प्र. क्र. ६** | वाईन म्हणजे काय? व वाईनमध्ये अल्कोहोलचे प्रमाण किती असते? |
| **उत्तर** | वाईन याचा अर्थ द्राक्षे किंवा इतर फळे, फुले, केळी, बीट यांचा साखर घातलेला किंवा न घातलेला नैसर्गिकरित्या आंबवलेला रस असा आहे. वाईनमध्ये अल्कोहोलचे प्रमाण १३-१५% असते. |
| **प्र. क्र. ७** | रम (Rum) म्हणजे काय? |
| **उत्तर** | 'रम' (Rum) म्हणजे मळी किंवा उसाचा रस आंबवून ऊर्ध्वपातन करून बनवलेले एक अल्कोहोलयुक्त पेय आहे. |

| | |
|---|---|
| **प्र. क्र. ८** | व्हीस्की (Whisky) म्हणजे काय? |
| **उत्तर** | व्हिस्की (Whisky/Whiskey) म्हणजे आंबवलेल्या धान्यांपासून (बार्ली, मका, गहू, राई इ.) बनवलेले एक डिस्टिल्ड अल्कोहोलिक पेय आहे |
| **प्र. क्र. ९** | सिंगल माल्ट व्हिस्की (Single Malt Whisky) म्हणजे काय? |
| **उत्तर** | सिंगल माल्ट व्हिस्की (Single Malt) Whisky) म्हणजे एकाच मद्य निर्मितीच्या कारखान्यात 100% माल्टेड बार्लीपासून (अंकुरित जव) बनवलेली आणि लाकडी पिंपांमध्ये कमीत कमी तीन वर्षे जुनी केलेली व्हिस्की, जी तिच्या शुद्धतेसाठी आणि अद्वितीय चवीसाठी ओळखली जाते, ज्यात इतर धान्ये मिसळलेली नसतात. |
| **प्र. क्र. १०** | ब्लेंडेड स्कॉच व्हिस्की (Blended Scotch Whisky)म्हणजे काय? |
| **उत्तर** | अशी व्हिस्की, ज्यात एकापेक्षा जास्त सिंगल माल्ट स्कॉच व्हिस्की आणि ग्रेन (धान्य) व्हिस्की यांचे मिश्रण (blend) केलेले असते, ज्यामुळे तिला एक विशिष्ट आणि संतुलित चव मिळते. सोप्या भाषेत, वेगवेगळ्या डिस्टिलरीमधील माल्ट व्हिस्की आणि ग्रेन व्हिस्की एकत्र मिसळून ही व्हिस्की तयार होते, जी सिंगल माल्टपेक्षा वेगळी असते. |
| **प्र. क्र. ११** | ब्रॅन्डी (Brandy) म्हणजे काय? |
| **उत्तर** | ब्रॅन्डी (Brandy) म्हणजे द्राक्षाचा रस आंबवून ऊर्ध्वपातन करून बनवलेले एक अल्कोहोलयुक्त पेय आहे. |
| **प्र. क्र. १२** | देशी मद्य (Country Liquor) म्हणजे काय? |
| **उत्तर** | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ अन्वये भारतामध्ये निर्मित मद्याला देशी दारु समजली जाते. |
| **प्र. क्र. १३** | विदेशी मद्य (Foreign Liquor) म्हणजे काय? |
| **उत्तर** | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ अन्वये भारताबाहेर निर्मित मद्याला विदेशी मद्य समजले जाते. तथापि राज्य शासन अधिसूचनेव्दारे कोणत्याही देशी मद्याला विदेशी मद्य समजण्यात यावे असे घोषित करु शकते. |
| **प्र. क्र. १४** | मद्य (Liquor) म्हणजे काय? |
| **उत्तर** | स्पिरीट, वाईन,बीयर, ताडी आणि सर्व प्रकारची पेय ज्यामध्ये अल्कोहोलचा समावेश आहे. तसेच राज्यशासन अधिसूचनेव्दारे कोणत्याही मादक द्रव्याला मद्य म्हणून जाहीर करु शकते. |
| **प्र. क्र. १५** | क्राफ्ट बिअर म्हणजे काय? |
| **उत्तर** | क्राफ्ट बिअर म्हणजे लहान, स्वतंत्र ब्रुवरीजमध्ये पारंपारीक पध्दतीने, कमी प्रमाणात बनविलेली बिअर. जी मोठया कंपन्यांच्या सामान्य बिअरपेक्षा वेगळी असते. ज्यात चवीची आणि प्रकाराचे वैविध्द् असते. आणि त्यात नवीन प्रयोग केलेले असतात. |
| **प्र. क्र. १७** | Fermented Beer म्हणजे काय? |
| **उत्तर** | ज्या बिअरमध्ये अल्कोहोलचे प्रमाण ५% पेक्षा जास्त परंतु ८% पर्यंत असते. |
| **प्र. क्र. १८** | Liquor Chocolate तयार करण्यास परवानगी आहे का? |
| **उत्तर** | सध्या शासन धोरणानुसार Liquor Chocolate बनविण्यास परवानगी दिली जात नाही. |
| **प्र. क्र. १९** | वेगवेगळया राज्यात दारुचे दर सारखे का नसतात? |
| **उत्तर** | भारतीय राज्यघटनेनुसार मद्यावर कर आकारण्याचे अधिकार राज्यांना दिलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक राज्यात मद्यावरील अबकारी शुल्काचे दर (Excise Duty) निश्चित करीत असतात. त्यामूळे प्रत्येक राज्याचे वेगवेगळ्या राज्यामध्ये दारूवरील मद्याचे दर विभिन्न असतात. |

*********************************************************************

## गट – ३ / Group III : अवैद्य मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीबाबत शिक्षेच्या तरतुदी.

| | |
|---|---|
| **प्र. क्र. १** | बेकायदेशीरपणे मळी/मद्य/मद्यार्क इ. ची आयात-निर्यात वाहतुक बाळगणे, विक्री करणे यासाठी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ मध्ये शिक्षेबाबत काय तरतुदी आहेत? |
| **उत्तर** | सदर प्रकरणी दोषसिध्दी झाल्यास तीन वर्षांपेक्षा कमी नसलेली परंतु पाच वर्षांपर्यंत वाढू शकेल अशा कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसलेली परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढू शकेल अशा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील. |
| **प्र. क्र. २** | सार्वजनिक ठिकाणी मद्यसेवन केल्यास कायद्यात शिक्षेबाबत काय तरतुदी आहेत? |
| **उत्तर** | सार्वजनिक ठिकाणी मद्यसेवन केल्यास रुपये ५०००/- पर्यंतची द्रव्य दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. |
| **प्र. क्र.३** | सार्वजनिक ठिकाणी मद्यसेवन करुन गैरवर्तणुक केल्यास कायद्यात शिक्षेबाबत काय तरतुदी आहेत. |
| **उत्तर** | जो कोणी व्यक्ति कोणत्याही रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी किंवा जिथे जनतेला प्रवेश आहे किंवा परवानगी आहे अशा कोणत्याही ठिकाणी, मद्याच्या नशेत गैरवर्तणुक करतो, त्याला दोषी ठरवल्यावर, शिक्षा होईल, -<br>**(अ)** पहिल्या गुन्ह्यासाठी, सहा महिन्यांपर्यंतच्या सक्तमजुरीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपर्यंत वाढू शकेल अशा दंडाची शिक्षा:परंतु, न्यायालयाच्या निकालात नमूद करावयाच्या विरुद्ध विशेष आणि पुरेशी कारणे नसल्यास, अशी शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि दंड पाच हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही; आणि<br>(ब) त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी, एक वर्षापर्यंत वाढू शकेल अशा मुदतीच्या सक्तमजुरीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांच्या दंडाची देखील शिक्षा होऊ शकते:परंतु, न्यायालयाच्या निकालात नमूद करावयाच्या विरुद्ध विशेष आणि पुरेशी कारणे नसल्यास, अशी शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि दंड सात हजार पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही. |
| **प्र. क्र.४** | स्वत:च्या जागेचा वापर सार्वजनिक दारुचा गुत्त्यासाठी होत असल्यास कारवाई होईल का? व किती शिक्षा असेल. |
| **उत्तर** | जो कोणी व्यक्ती स्वत:च्या जागेचा वापर सार्वजनिक दारुचा गुत्त्यासाठी करते किंवा सार्वजनिक दारुचा गुत्त्या सुरू असलेल्या कोणत्याही जागेची काळजी, व्यवस्थापन किंवा नियंत्रण असेल किंवा कोणत्याही प्रकारे व्यवसाय चालविण्यास मदत करेल, तर त्याला दोषी ठरवल्यास, तीन वर्षांपेक्षा कमी नसलेली परंतु पाच वर्षांपर्यंत वाढू शकेल अशा कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसलेली परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढू शकेल अशा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील. |
| **प्र. क्र.५** | विनापरवाना मद्य सेवन केल्यास शिक्षेबाबत काय तरतुदी आहे. |
| **उत्तर** | **पहिल्या अपराधासाठी** -सहा महिल्यापर्यंतचा कारावास आणि रु. १०,०००/- पर्यंत द्रव्य दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. परंतु मा. न्यायालय विशेष व सबळ कारण नसल्यास तीन महिन्यापेक्षा कमी नसेल असा कारावास आणि रु. ५०००/- पेक्षा कमी नसेल अशा द्रव्य दंडाची शिक्षा करु शकतात.<br>**दुस-या अपराधासाठी** -दोन वर्षापर्यंत कारावास आणि रु. २०,०००/- पर्यंत द्रव्य दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. परंतु मा. न्यायालय विशेष व सबळ कारण नसल्यास सहा महिन्यापेक्षा कमी नसेल असा कारावास आणि रु. १०,०००/- पेक्षा कमी नसेल अशा द्रव्य दंडाची शिक्षा करु शकतात.<br>**तिस-या आणि तद्नंतरच्या अपराधासाठी** - दोन वर्षापर्यंत कारावास आणि रु. २०,०००/- पर्यंत द्रव्य दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. परंतु मा. न्यायालय विशेष व सबळ कारण नसल्यास नऊ महिन्यापेक्षा कमी नसेल असा कारावास आणि रु. १०,०००/- पेक्षा कमी नसेल अशा द्रव्य दंडाची शिक्षा करु शकतात. |

| | |
|---|---|
| **प्र. क्र.६** | जिल्हाधिकारी यांनी किरकोळ मद्यविक्रीची अनुज्ञप्ती रद्द केल्यास अपील कोणाकडे व कोणत्या कलमानुसार दाखल करता येते. |
| **उत्तर** | जिल्हाधिकारी यांनी किरकोळ मद्यविक्रीची अनुज्ञप्ती रद्द केल्यास, त्यांच्या आदेशाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम १३७ अन्वये अपील करता येतील. |
| **प्र. क्र.७** | आयुक्तांचे आदेशाविरुध्द शासनाकडे पुनरिक्षण अर्ज दाखल करता येऊ शकतो का? असल्यास कोणत्या कायदा व कलमान्वये करता येते. |
| **उत्तर** | आयुक्तांनी अपीलामध्ये दिलेल्या आदेशाविरुध्द शासनाकडे महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम १३८ नुसार असा पुनरिक्षण अर्ज दाखल करता येईल. |
| **प्र. क्र.८** | आदिवासी क्षेत्रात मोहाफुले गोळा करणे, विक्री करणे याबाबत नियमांत काय तरतुदी आहेत. |
| **उत्तर** | आदिवासी क्षेत्रात मोहाफुले गोळा करणे, विक्री करणे याबाबत आदिवासी लोकांना कोणत्याही परवान्याची आवश्यकता नाही. |
| **प्र. क्र.९** | वाईन शॉप (FLII) अनुज्ञप्तीमधून MRP पेक्षा जास्त दराने मद्य विक्री केली जाते का? |
| **उत्तर** | वाईन शॉप (FLII) अनुज्ञप्तीमधून MRP पेक्षा जास्त दराने मद्य विक्री करता येत नाही. |
| **प्र. क्र.१०** | देशी दारु दुकान (CL -III) अनुज्ञप्तीमधून MRP पेक्षा जास्त दराने मद्य विक्री केली जाते का? |
| **उत्तर** | देशी दारु दुकान (CL -III) अनुज्ञप्तीमधून MRP पेक्षा जास्त दराने सीलबंद बाटलीतून मद्य विक्री करता येत नाही. |
| **प्र. क्र.११** | बिअर शॉपी (FLBR II) अनुज्ञप्ती मधून कोणत्या प्रकारचे मद्य विक्री करण्यास परवानगी आहे. |
| **उत्तर** | बिअर शॉपी (FLBR II) अनुज्ञप्ती मधून बीयर व वाईन विक्री करण्यास परवानगी आहे. |
| **प्र. क्र.१२** | देशी दारु दुकानातून कोणत्या प्रकारचे मद्य विक्री करण्यास परवानगी आहे. |
| **उत्तर** | देशी दारु दुकानातून देशी मद्य विक्री करण्यास परवानगी आहे. तसेच सीलबंद बाटलीतून बियर विक्री करण्यास परवानगी घेतली असल्यास बियर विक्री करता येते. |
| **प्र. क्र.१३** | परवाना कक्ष/एफएल-३ अनुज्ञप्ती मधून कोणत्या प्रकारचे मद्य विक्री करण्यास परवानगी आहे. त्याठिकाणी एमआरपीपेक्षा जास्त दराने मद्यविक्री करता येते का? |
| **उत्तर** | परवाना कक्ष/एफएल-३ अनुज्ञप्ती मधून विदेशी मद्य, बीयर व वाईन विक्री करण्यास परवानगी आहे. परवाना कक्ष/एफएल-३ अनुज्ञप्तीमध्ये इतर सुविधा पुरविल्या जात असल्याने व पेग पध्दतीने मद्य पुरवठा केला जात असल्यामूळे MRP चे बंधन नाही. |
| **प्र. क्र.१४** | मद्यसेवन परवान्यावर किती मद्य बाळगता व वाहतूक करता येते. |
| उत्तर | I) मद्यसेवन परवान्यावर १२ यूनिट प्रतिमाह विदेशी मद्य बाळगता व वाहतूक करता येते.<br>II) मद्यसेवन परवान्यावर २ यूनिट प्रतिआठवडा देशी मद्य बाळगता व वाहतूक करता येते.<br>१ यूनिट म्हणजे :-<br>अ) १००० मिली देशी/विदेशी मद्य<br>आ)१५०० मिली वाईन<br>इ) २६०० मिली सौम्य मद्य |
| **प्र. क्र.१५** | किरकोळ मद्यविक्रीची अनुज्ञप्ती रद्द अथवा निलंबित करण्याचे अधिकार कोणास आहेत? |
| **उत्तर** | किरकोळ मद्यविक्रीची अनुज्ञप्ती रद्द अथवा निलंबित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. |
| **प्र. क्र.१६** | विदेशी मद्याचे घाऊक विक्रेते (FL I) यांना कोणत्या प्रकारची मद्य विक्री करण्यास परवानगी आहे? |
| **उत्तर** | विदेशी मद्याचे घाऊक विक्रेते (FL I) यांना विदेशी मद्य, बीयर, वाईन, आयात केलेल मद्य इ. प्रकारच्या मद्याची घाऊक विक्री करण्यास परवानगी आहे. |

| | |
|---|---|
| **प्र. क्र.१७** | देशी मद्याचे घाऊक विक्रेते (CL II) यांना कोणत्या प्रकारचे मद्य विक्री करण्यास परवानगी आहे? |
| **उत्तर** | देशी मद्याचे घाऊक विक्रेते (CL II) यांना केवळ देशी मद्याची विक्री करण्यास परवानगी आहे. |
| **प्र. क्र.१८** | भारतातील इतर राज्यातून मद्य आयात करुन महाराष्ट्रात विक्री करावयाची असल्यास त्याकरिता काय प्रक्रिया आहे. |
| **उत्तर** | भारतातील इतर राज्यातून मद्य आयात करुन महाराष्ट्रात विक्री करावयाची असल्यास परराज्यातील ज्या मद्य निर्मात्याला त्याचे मद्य महाराष्ट्रात आयात करावयाचे आहे त्याने महाराष्ट्रात फॉर्म K परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परवाना आयुक्त कार्यालयातून दिला जातो. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| **प्र. क्र.१९** | परदेशातून मद्य आयात करुन महाराष्ट्रात विक्री करावयाची असल्यास त्याकरिता काय प्रक्रिया आहे. |
| **उत्तर** | परदेशातून मद्य आयात करुन महाराष्ट्रात विक्री करावयाची असल्यास परदेशातील मद्य ज्यांना महाराष्ट्रात आयात करावयाचे आहे त्यांनी फॉर्म L नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. सदर नोंदणी प्रक्रिया आयुक्त कार्यालयातून केली जाते. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| **प्र. क्र.२०** | किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्तीवर अधिका-यांनी विसंगती प्रकरण नोंदविल्यास जिल्हाधिकारी यांना किती रकमेपर्यंत दंड करण्याचे अधिकार आहेत. |
| **उत्तर** | किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्तीवर राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांनी विसंगती प्रकरण नोंदविल्यास जिल्हाधिकारी यांना जास्तीत जास्त रु.५००००/- पर्यंत दंड करण्याचे अधिकार आहेत. |
| **प्र. क्र.२१** | बेकायदेशीर मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री बाबत माहिती द्यावयाची असल्यास ती कोणाकडे द्यावी. |
| **उत्तर** | बेकायदेशीर मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री बाबत माहिती द्यावयाची असल्यास क्षेत्रीय/जिल्हास्तरीय/विभागीय राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात माहिती देऊ शकता अथवा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संकेतस्थळावर Grievance मध्ये तक्रार दाखल करू शकता. अथवा खालील क्रमांकावर तक्रार नोंदवू शकता.<br>व्हाट्सअप क्र. Whatsapp number:- ८४२२००११३३<br>दुरध्वनी क्र. Landline Number:- ०२२-२०८२२४८८<br>टोल फ्री क्र. Toll free Number:- १८००८३३३३३३ |
| **प्र. क्र.२२** | नियमांनुसार किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या कोणत्या दिवशी बंद (Dry Day) ठेवावी लागते. |
| **उत्तर** | महाराष्ट्र दारुबंदी कायदा व त्याअंतर्गतचे नियमान्वये किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या पुढील दिवशी बंद ठेवाव्या लागतात.<br>१. २६ जानेवारी<br>२. ३० जानेवारी.<br>३. ०१ मे.<br>४. १५ ऑगस्ट<br>५. २ ऑक्टोबर<br>६. आषाढी एकादशी<br>७. अनंत चतुर्दशी<br>८. कार्तिकी एकादशी. |
| **प्र. क्र.२३** | वरील Dry Day तीन व त्यापेक्षा जास्त स्टार कॅटेगिरीच्या हॉटेल मधील FL III अनुज्ञप्तींना लागू असतात का? |
| **उत्तर** | प्र.क्र. २२ च्या उत्तरातील ७ Dry Days हे Three Star व त्यापेक्षा जास्त Star असलेल्या हॉटेलमधील परवानाकक्ष/FL III अनुज्ञप्तींना लागू नसतात. |

****************************************************************************

## गट — ४ / Group IV :अनुज्ञप्त्या मंजुरीबाबत शासनाचे धोरण.

| | |
|---|---|
| **प्र. क्र. १** | नवीन वाईन शॉप व देशी दारु दुकान मंजुर केली जातात का? |
| **उत्तर** | शासन धोरणानुसार नवीन वाईन शॉप व देशी दारु दुकान मंजुर केली जात नाहीत. |
| **प्र. क्र. २** | रेस्टॉरंटला परवानाकक्ष/एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुर केली जाते का? |
| **उत्तर** | होय. रेस्टॉरंटला परवानाकक्ष/एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुर केली जाते. |
| **प्र. क्र. ३** | नवीन बीअर शॉपी (FLBR II)अनुज्ञप्ती मंजुर केली जाते का? |
| **उत्तर** | होय. नवीन बीअर शॉपी (FLBR II)अनुज्ञप्ती मंजुर केली जाते. |
| **प्र. क्र. ३** | रेस्टॉरंटला परवानाकक्ष (FL-III) मंजुर करण्यासाठी सक्षम अधिकारी कोण आहे? |
| **उत्तर** | जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीवरुन जिल्हाधिकारी हे अनुज्ञप्ती मंजुर करण्यास सक्षम अधिकारी आहेत. |
| **प्र. क्र.४** | बीअर शॉपी (FLBR II) मंजुर करण्यासाठी सक्षम अधिकारी कोण आहे? |
| **उत्तर** | बीअर शॉपी (FLBR II) मंजुर करण्यासाठी अधीक्षक हे सक्षम अधिकारी आहेत परंतु तत्पुर्वी विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांची पुर्वमान्यता घेणे आवश्यक आहे. |
| **प्र. क्र.५** | देशी मद्य निर्मिती करण्यास परवानगी दिली जाते का? ते अधिकार कोणाचे आहेत? |
| **उत्तर** | देशी मद्य निर्मितीच्या Stand Alone कारखान्यास परवानगी दिली जात नाही. परंतु एखाद्या घटकाने जर धान्याधारित आसवनीचे फॉर्म —आय अनुज्ञप्ती घेतली असेल तर त्यांना देशी मद्य निर्मितीस सीएल-१ अनुज्ञप्ती दिली जाते. देशी मद्य निर्मितीकरिता परवानगी देण्याचे अधिकार शासनाचे आहेत. |
| **प्र. क्र. ६** | पेय मद्य / विदेशी मद्य निर्मिती करण्यास परवानगी दिली जाते का? ते अधिकार कोणाचे आहेत? |
| **उत्तर** | पेय मद्य निर्मितीच्या Stand Alone कारखान्यास परवानगी दिली जात नाही. परंतु एखाद्या घटकाने जर धान्याधारित आसवनीचे फॉर्म —आय अनुज्ञप्ती घेतली असेल तर त्यांना पेय मद्य निर्मितीस पीएलएल अनुज्ञप्ती दिली जाते. पेय मद्य निर्मितीकरिता परवानगी देण्याचे अधिकार शासनाचे आहेत. |
| **प्र. क्र. ७** | बिअर निर्मितीचा कारखाना सुरु करण्यास परवानगी दिली जाते का? ते अधिकार कोणाचे आहेत? |
| **उत्तर** | बिअर निर्मितीचा कारखाना कारखाना सुरु करण्यास परवानगी दिली जाते. ते अधिकार शासनाचे आहेत. त्याकरिता BRL(Brewery) अनुज्ञप्ती दिली जाते. |
| **प्र. क्र. ८** | वाईन निर्मितीचा कारखाना सुरु करण्यास परवानगी दिली जाते का? ते अधिकार कोणाचे आहेत? |
| **उत्तर** | वाईन निर्मितीचा कारखाना कारखाना सुरु करण्यास परवानगी दिली जाते. ते अधिकार जिल्हाधिकारी यांचे आहेत. त्याकरिता BRL(Winery) अनुज्ञप्ती दिली जाते. |
| **प्र. क्र. ९** | डिस्टीलरी म्हणजे काय? व डिस्टीलरी/ आसवनी सुरु करण्यासाठी परवानगी दिली जाते का? ते अधिकार कोणाचे आहेत? |
| **उत्तर** | डिस्टीलरी म्हणजे स्पिरीट/मदयार्क निर्मिती करण्यासाठीचा कारखाना/यूनिट असा आहे व डिस्टीलरी/ आसवनी सुरु करण्यास परवानगी दिली जाते. ते अधिकार शासनाचे आहेत. त्याकरिता फॉर्म-आय अनुज्ञप्ती दिली जाते. |
| **प्र. क्र. १०** | एकत्रित येऊन दारुची पार्टी करण्यासाठी परवाने मिळविण्यासाठी कोणती प्रक्रिया राबवली जाते. |
| **उत्तर** | एकत्रित येऊन दारुची पार्टी करण्यासाठी परवाने मिळविण्यासाठी तात्पुरती एक दिवसीय कार्यक्रमाचा परवाना/ तात्पुरती क्लब अनुज्ञप्ती आवश्यक आहे. त्याकरिता प्रथम जागेची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या जागेवर FL IV A अनुज्ञप्ती अधीक्षक कार्यालयातून मंजुर केली जाते. जागेची नोंदणी व FL IV A अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |

*******************************************************************

## गट – ५ / Group V : मद्यसेवन परवाना व त्याचे प्रकार, फी.

| | |
|---|---|
| **प्र. क्र. १** | मद्यसेवन परवान्याचे किती प्रकार आहेत व फी बाबत माहिती द्यावी. |
| **उत्तर** | मद्यसेवन परवान्याचे ३ प्रकार आहेत. फी रुपये<br>अ) कायमस्वरूपी मदयसेवन परवाना : रु. १०००/-<br>आ)एक वर्षीय मदयसेवन परवाना : रु. १००/-<br>इ) एक दिवसीय मदयसेवन परवाना : रु. ५ विदेशी मद्य, रु. २ देशी मद्य.<br><br>परवाना प्राप्त करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन परवाने दिले जातात. |
| **प्र. क्र. २** | मद्यसेवन परवान्यासाठी वयाची अट काय आहे? |
| **उत्तर** | वर्धा जिल्हयासाठी किमान वय ३० वर्षे तर इतर ठिकाणी किमान वय २५ वर्षे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी वय असलेल्या इसमांनी मद्यसेवन केल्यास कायदेशीर कारवाई होईल. |
| **प्र. क्र. ३** | सौम्य बीयर पिण्यासाठी परवान्याची आवश्यकता असते का? |
| **उत्तर** | सौम्य बियरचे सेवन करण्यासाठी वयोमर्यादा किमान २१ वर्ष असावी लागते. सौम्य बियर पिण्यासाठी २१ वर्षावरील इसमांना परवान्याची आवश्यकता नसते. |

**----------------------------------------The End -------------------------------------------------**